# प्रेस नोट दिनांक २६/०७/२०१८

कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे शहर गु.र.न १८६/२०१८ भादंवि कलम ४०६,४२०,४६८,४७०,३४ मधील फिर्यादी नामे श्रीमती श्वेता नेमळेकर, रा.पुणे यांची व आरोपी नामे राहुल करम सिंग व श्वेता सिंग सन २०१६ मध्ये ओळख झाली.

फिर्यादी हया सुशिक्षित असून त्या कामाच्या शोधात असल्याने आरोपीने त्यांना, आरोपीची इक्विनॉक्स सोलुशन नावाची कंपनी हैद्राबाद येथे असल्याचे सांगितले व सदर कंपनी ही आय.बी.एम व एस.टी.पी.आय गर्व्हमेंट ऑफ इंडीया यांचेबरोबर टायअप असल्याचे सांगुन त्यांना बनावट कागदपत्रे दाखवून त्यांचा विश्वास संपादन केला. फिर्यादी यांना सोलर संबंधित प्रोजेक्ट मिळवून देतो, त्यामध्ये तुम्ही गुंतवणूक करा, मोठा फायदा होईल, असे आमिष दाखविले व फिर्यादी यांना गनका व ग्रॅनसोल नावाच्या दोन कंपनी यु.एस.ए येथे रजिस्टर करण्यास भाग पाडले व फिर्यादी यांना सदर व्यवसायाकरिता गुंतवणूकदार शोधण्यास सांगून फिर्यादी व गुंतवणुकदार यांना नमुद कंपनीच्या बँक अकाऊंटमध्ये पैसे भरणेस सांगितले. फिर्यादी व गुंतवणूकदार यांनी त्याप्रमाणे नमूद खात्यावर पैसे भरले. आरोपी नामे राहूल करम सिंग याचे इक्विनॉक्स सोल्यूशन या कंपनीचे बँक ऑफ बडौदा येथे बँक अकाऊंट होते. त्या बँक अकाऊंटवर स्वतःचे फायदयाकरिता नमूद पैसे वर्ग करून घेतले व फिर्यादी यांना सोलर संबंधी प्रोजेक्टही दिला नाही व पैसेही परत न करता त्याने फिर्यादी व गुंतवणूकदार यांची ३०,७५,११३/- रु.ची आर्थिक फसवणूक केली आहे. सदरचा गुन्हा हा दि.०८/११/२०१७ रोजी दाखल होता. दाखल गुन्हयाचा तपास पो.हवा.दिनेश शिंदे, कोरेगाव पार्क पो.स्टे. पुणे शहर हे वरिष्ठांचे मार्गदर्शनाखाली करत आहे. आरोपींचा शोध घेवून सुद्धा आरोपी मिळून येत नव्हता.

दि.१६/०७/२०१८ रोजी कोरेगाव पार्क पो.स्टे. कडील पोलीस कर्मचारी विनोद साळुंके यांना वरील आरोपी राहूल सिंग याचे संदर्भात मिळालेल्या बातमीवरून सापळा लावून त्यास पकडून अटक केली. तपासामध्ये आरोपीने अशा प्रकारचे फसवणुकीचे गुन्हे यापूर्वी अमरावती, जालना, हैद्राबाद या ठिकाणी केले असलेबाबत तपासात निष्पन्न झालेले आहे.

नमूद गुन्हयातील पाहिजे असलेला आरोपी राहूल करम सिंग हा त्याचे राहण्याचे ठिकाणे सतत बदलत असल्याने व तो वेगवेगळया ठिकाणी आपले अस्तित्व लपवून राहत होता. त्यास मा.श्री.रविंद्र सेनगावकर सो., अपर पोलीस आयुक्त, द.प्रा.वि.पुणे शहर, मा.श्रीमती ज्योति प्रिया सिंह सो., पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, पुणे शहर, मा.श्रीमती जयश्री गायकवाड, सहा.पोलीस आयुक्त, लष्कर विभाग, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली श्री.मदन बहाद्दरपुरे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, कोरेगाव पार्क पो.स्टे.पुणे, पोलीस कर्मचारी दिनेश शिंदे, विनोद साळुंके, रियाज शेख, अनिल मंदे, निशीकांत सावंत, गणेश गायकवाड, संदिपकुमार गर्जे, संदिप गायकवाड यांनी सापळा रचून त्यास पकडून सदरचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.

Bahaddarpure